**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**शुक्रवार दिनांक ०९ ऑक्टोबर २०२६**

**ठळक बातम्या**

1. **नागपूर पदवीधर मतदारसंघ निवडणुकीत भाजप कार्यकर्ते रमण सेनाड यांच्यासह १६ उमेदवारांची माघार.**
2. **केंद्रीय पथकाचा राज्यातल्या दुष्काळग्रस्त भागात पाहणी दौरा सुरू; अमरावती विभागातील दुष्काळाचा आढावा; वाशिम जिल्ह्याची पाहणी.**
3. **दुष्काळग्रस्त ३६ तालुक्यांचे पुन्हा सर्वेक्षण; १८ तालुक्यांमध्ये २० टक्के प्रत्यक्ष पडताळणी करण्याचा शासन आदेश जारी.**
4. **भारतीय वंशाच्या नवेनेथम नवी पिल्लई यांना यंदाचा शांततेचा नोबेल पुरस्कार जाहीर.**

**आता सविस्तर बातम्या .......**

विधान परिषद

नागपूर पदवीधर मतदारसंघ निवडणूकित १६ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. एकूण 54 उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. नागपूर पदवीधर मतदारसंघातून अर्ज दाखल केलेले भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते रमण सेनाड यांनी आपला उमेदवारी अर्ज आज मागे घेतला. वरिष्ठ नेत्यांसोबतच्या चर्चेनंतर पक्षाविरुद्ध बंडखोरी करणं योग्य नाही, ही भूमिका घेत सेनाड यांनी माघार घेतली. आपण भाजपचे अधिकृत उमेदवार सुधाकर कोहळे यांना पूर्ण पाठिंबा देत असून त्यांच्याच विजयासाठी काम करणार असल्याचं देखील त्यांनी स्पष्ट केलं. अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी दाखल ३१ नामनिर्देशन पत्रांपैकी ३० वैध ठरली असून, त्यापैकी आज चार उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. आता निवडणूक रिंगणात एकूण 26 उमेदवार आहेत. उमेदवारी मागे घेण्याची अंतिम मुदत आज दुपारी ३ वाजता संपली. दरम्यान, पुणे शिक्षक मतदारसंघातून महायुतीमधील शिवसेनेच्या मंगेश चिवटे आणि राष्ट्रवादीच्या प्रताप माने यांनी आपली उमेदवारी मागे घेतली. त्यामुळे, इथं भाजप उमेदवार कौस्तुभ गावडे हेच महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून निश्चित झाले आहेत. मात्र, येथेही माजी आमदार दत्तात्रय सावंत, सचिन सानप यांच्यासह अनेक उमेदवारांचे आव्हान भाजप महायुतीला आहे. तर, महाविकास आघाडीकडून कॉंग्रेस उमेदवार जयंत आसगावकर हे उमेदवार असल्यान येथेही तिहेरी लढत मानली जाते.

लोकशाही दिन

विधानपरिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू असल्यानं ऑक्टोबर महिन्यातील विभागीय लोकशाही दिन आणि महिला विभागीय लोकशाही दिनाच आयोजन करण्यात येणार नाही असं आवाहन अपर आयुक्त संजय जाधव यांनी केलं आहे.

दुष्काळ पाहणी

केंद्राच्या आंतरमंत्रालयीन पथकाने आज अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांतील दुष्काळी परिस्थितीचा जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा घेतला.या बैठकीत वाशिमचे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्यासह अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, अकोला जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांनी पावसाची कमतरता, पीक नुकसान, पाणीटंचाई आणि मजूर स्थलांतराबाबत सादरीकरण केलं. बैठकीनंतर पथकाने वाशिम तालुक्यातील सुपखेला, मंगरूळपीर तालुक्यातील स्वासिन आणि कोठारी, मानोरा तालुक्यातील कुपटा आणि कारंजा तालुक्यातील काळी कारंजा, तसंच पानविहीर इथं प्रत्यक्ष शेतांची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला. तत्पूर्वी, केन्द्रीय पथकाने मराठवाड्यात देखील शेतशिवाराची पाहणी केली.

दुष्काळ तालुके

राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर यापूर्वीच्या २६५ तालुक्यांच्या यादीबाहेरील आणखी ३६ तालुक्यांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी दुष्काळाच्या निकषांबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या १८ तालुक्यांमध्ये २० टक्के ग्राउंड ट्रुथिंग अर्थात प्रत्यक्ष पडताळणी करण्याचा शासन आदेश सरकारनं आज जारी केला. विविध निकषांमुळं या तालुक्यांचा समावेश दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये झाला नव्हता. त्यानंतर स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनुसार राज्य सरकारनं या १८ तालुक्यात दुष्काळ सर्वेक्षण करायचा निर्णय जाहीर केला. दरम्यान, पीक कर्जमाफीच्या लाभापासून ई-केवायसीअभावी वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी गावनिहाय याद्या तयार केल्या जाणार आहेत. पीक कर्जमाफीसाठीचे अर्ज मंजूर झालेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी तलाठी आणि ग्रामसेवक घरोघरी जाऊन ई-केवायसीची प्रक्रिया पूर्ण करतील, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

नोटीस

महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडच्या आदिवासीबहुल भागांमध्ये बालकांचं कुपोषण आणि प्रतिबंध करण्याजोग्या आजारांच्या उद्रेकासंदर्भात दाखल झालेल्या जनहित याचिकेवर, सर्वोच्च न्यायालयानं या ३ राज्यांसह केंद्र सरकारला नोटिस बजावली आहे. कुपोषण आणि प्रशासकीय हस्तक्षेपाच्या अभावामुळे आदिवासी मुलांचे होत असलेले मृत्यू ही अतिशय गंभीर बाब असल्याचं मत सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची, आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या पीठानं नोंदवलं.

सेवा संकल्प - वंदे भारत रेल्वे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून कामाला सुरुवात केली त्याला २५ वर्षं झाली. या काळात ते आधी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि नंतर भारताचे पंतप्रधान म्हणून सलग कार्यरत आहेत. जनसेवा ते देशसेवा असा हा प्रवास सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरुन विकसित भारत २०४७ च्या दिशेनं होत आहे. या अंतर्गत  विशेष मालिकेत आज आपण जाणून घेणार आहोत वंदे भारत रेल्वे गाड्यांविषयी -

***भारतात वेगवान रेल्वेगाड्यांसाठी दीर्घकाळ परदेशी तंत्रज्ञानावर अवलंबून राहावे लागत होते. आधुनिक अर्ध-वेगवान रेल्वेगाड्यांची स्वदेशी निर्मिती आणि तंत्रज्ञान विकसित करण्याची क्षमता मर्यादित होती. या पार्श्वभूमीवर, भारताची पहिली स्वदेशी अर्ध-वेगवान रेल्वेगाडी म्हणून वंदे भारत विकसित करण्यात आली. त्यामुळे प्रमुख शहरांमधील प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी झाला. प्रवाशांना जागतिक दर्जाच्या सुविधा, आराम आणि सुरक्षिततेचा अनुभव मिळू लागला.वंदे भारतने सिद्ध केल की, भारत आधुनिक रेल्वेगाड्यांची रचना, निर्मिती आणि संचालन स्वतः करू शकतो. विविध मार्गांवर या गाड्यांचा विस्तार सुरू असून, रेल्वे क्षेत्रातील स्वदेशी तंत्रज्ञानाला नवी दिशा मिळाली आहे. वाढत्या मध्यमवर्गाच्या आकांक्षा पूर्ण करणे म्हणजे त्यांचे जीवन अधिक सुलभ करणे, स्वप्नांना नवी उंची देणे आणि संधींची शक्यता अधिक जवळ आणणे होय.  हीच संकल्पना वेगवान रेल्वेगाड्यांच्या आणि वंदे भारताच्या निर्मितीमागे आहे.***

इंडिया आघाडी

एसआयआर प्रक्रियेत अनियमितता झाल्याच्या आरोपावरून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी इंडिया आघाडीचं शिष्टमंडळ आज रात्री आठ वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेणार आहे. या शिष्टमंडळात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष ममता बॅनर्जी यांच्यासह १० सदस्यांचा समावेश असेल.

नोबेल पुरस्कार

यंदाचा शांततेसाठीचा नोबेल पुरस्कार नवेनेथेम नवी पिल्लई यांना जाहीर झाला आहे. आंतरराष्ट्रीय कायद्याचं पालन आणि शांततेसाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांना हा पुरस्कार दिल्याचं नॉर्वेच्या नोबेल समितीनं म्हटलं आहे. २००८ ते २०१४ या कालावधीत त्या संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार उच्चायुक्त म्हणून कार्यरत होत्या. गुलामगिरीच्या विरोधात उभे ठाकलेले नेल्सन मंडेला यांच्यासह इतरांचा न्यायालयात बचाव करणाऱ्या वकील, ते आंतरराष्ट्रीय कायदेशीर प्रकरणांमध्ये न्यायाधीश म्हणून त्यांनी दिलेल्या योगदानासाठी त्यांना या पुरस्कारानं गौरवलं जाणार आहे. दक्षिण आफ्रिकेत गुलामगिरीच्या काळात, भारतीय तमिळ कुटुंबात १९४१ मध्ये जन्मलेल्या नवी पिल्लई यांनी कायद्याचं शिक्षण घेतलं आणि व्यवस्थेत खोलवर गेलेल्या भेदभावावर त्यांनी प्रहार केला. हॉवर्ड विद्यापीठातून त्यांनी कायद्याच्या शिक्षणात पीएचडी केली आहे.

ग्रामस्वच्छता अभियान

ग्रामीण नागरिकांचे आरोग्य आणि जीवनमान उंचावण्याच्या उद्देशाने संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची सन २०२६-२७ या वर्षासाठी सुरुवात झाली आहे. हे अभियान दि.३० जानेवारी २०२७ पर्यंत राबविण्यात येणार असून, या माध्यमातून नागपूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमध्ये स्वच्छतेचा जागर पुन्हा एकदा व्यापक स्वरूपात करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून गावांना अधिक स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी बनवावे, असं आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी केलं. या अभियानांतर्गत नागपूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींसाठी ४६ लाख १० हजार रुपयांची पारितोषिके जाहीर करण्यात आली असल्याचं उप मुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल उंदिरवाडे यांनी सांगितलं....

परवानगी नाकारली

दिल्लीत जंतरमंतर इथं उद्या होणाऱ्या कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाला दिल्ली पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. जंतर मंतरवर निदर्शनं किंवा इतर कोणतेही कार्यक्रम आयोजित करण्यासाठी किमान १० दिवस आधी परवानगीचा अर्ज सादर करणं आवश्यक असतं. सीजेपीला यापूर्वीही जंतरमंतर वर आंदोलन करण्याची परवानगी दिली होती, मात्र त्यांनी मार्गदर्शक तत्वं आणि हमीपत्राचं पालन केलं नाही. त्यामुळे आंदोलनाला परवानगी देण्यात आलेली नाही, असं दिल्ली पोलिसांच्या सह आयुक्त नुपूर प्रसाद यांनी आज वार्ताहरांशी बोलताना स्पष्ट केलं. सार्वजनिक सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी 'भारतीय नागरिक सुरक्षा संहिता'च्या कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश सध्या या भागात लागू आहेत. कायद्याचं उल्लंघन करणाऱ्या कोणावरही दिल्ली पोलीस योग्य ती कायदेशीर कारवाई करतील, असा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान, दिल्लीत आज दुपारी २ वाजल्यानंतर आपल्या मूळ स्थानकांवरून सुटणाऱ्या आणि उद्या पहाटे ४ ते दुपारी २ या वेळीत नवी दिल्ली आणि हजरत निजामुद्दिन स्थानकांवर पोहोचणाऱ्या सर्व मेल आणि एक्सप्रेस गाड्या रद्द केल्या जातील, अशी माहिती रेल्वे मंत्रालयाने दिली आहे.

क्रिकेट

भारत आणि वेस्ट इंडीज यांच्यातल्या पाच सामन्यांच्या टी-२० क्रिकेट मालिकेतील दुसरा सामना आज रांची इथं संध्याकाळी ७ वाजता सुरू होईल. पहिला सामना जिंकून भारताने मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

भारतीय जनसंचार संस्था

पत्रकारितेत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावी वापरातून रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील, असा सूर आयआयएमसी अर्थात भारतीय जनसंचार संस्थान अमरावती इथं आयोजित आठ दिवसीय कार्यशाळेत

उमटला. ‘कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता’ या विषयावरील कार्यशाळेत बातमी लेखन,संपादन, तथ्य पडताळणी, डिजिटल कंटेंट, ऑडिओ-व्हिडिओ निर्मिती आणि एआयच्या नैतिक वापराबाबत विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आलं.

*****